# स्वच्छ दूध निर्मिती-काळाची गरज



♦ डॉ. संजयकुमार विठ्ठलराव उद्धरवार, विषय तज्ञ (पशूविज्ञान) कृषी विज्ञान केंद्र, उत्तर गोवा
♦ डॉ. एच.बी. चेतनकुमार, सायंटिस्ट (पशूविज्ञान)
♦ डॉ. एकनाथ चाकूरकर, प्रभारी संचालक व प्रिन्सिपल सायंटिस्ट (पशूविज्ञान),
आय.सी.ए.आर.- सी.सी.ए.आर.आय. जुने गोवे, गोवा ४०३४०२.

आपल्या देशात जास्तकरून गायी, म्हशीचे दूध वापरले जाते. दुधाला पूर्ण अन्न असे म्हटले जाते.दुधाचे मानवी आहारात महत्वाचे स्थान आहे. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी स्वच्छ दूध मिळणे गरजेचे आहे.

**स्वच्छ दूध :**

स्वच्छ दूध म्हणजे असे दूध जे निरोगी जनावरांपासून काढलेले, दुर्गंधी किंवा कुठल्याही प्रकारची घाण नसलेले आणि सूक्ष्म जंतूचे प्रमाण कमीत कमी असलेले दूध होय.

**स्वच्छ दूधनिर्मितीसाठी उपाय व शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी :**

स्वच्छ दूधनिर्मितीसाठी तसेच दुग्धव्यवसाय फायदेशीर राहण्यासाठी त्रीसूत्री स्वच्छतेची अत्यंत गरज आहे. त्यामध्ये दूध काढणारी व्यक्ती , दुधाळ जनावरे तसेच सभोवतालचे वातावरण (गोठा व गोठ्यातील नियोजन) ह्या तीन गोष्टी सदैव स्वच्छ असल्या पाहिजेत.

**१. दूध काढणारी व्यक्ति :**

सदैव स्वच्छ असावा. तो स्वतची व कपड्याची स्वच्छता ठेवावी. हाताची नखे कापलेली असावीत. धारा काढतेवेळी धूम्रपान करू नये, तंबाखू खाऊ नये कारण या व्यसनामुळे दुधास वास लागतो तसेच दूध काढत असतांना दुधाच्या पात्राच्या दिशेने खोकलू किंवा शिंकू नये. ती व्यक्ति निरोगी असावी. त्याला क्षय, खरूजासारखे आजार असू नये तसेच हातावर जखमा असू नये. दूध काढण्यापूर्वी तो आपले हात साबणाने स्वच्छ धुवून आणि पुसून घ्यावे.

**२. जनावरांचा गोठा :**

गोठ्यात जनावरांची गर्दी नसावी. गर्दी असल्यास एका गायीचे शिंग दुसऱ्या गायीला लागून किंवा दुसऱ्या गायीने सडावर पाय दिल्यामुळे जखमा होऊन कासदाह निर्माण होऊ शकतो. कळपातील जनावरांना कुठल्याही प्रकारचा संसर्गजन्य आजार असू नये जसे क्षय आजार. असे दूध माणवास पिण्यासाठी हानिकारक असू शकतो. गोठा सदैव स्वच्छ असावा. गोठ्यात हवा खेळती असावी . सूर्यप्रकाश मुबलक प्रमाणात मिळावे जेणेकरून गोठ्यातील खालची जागा कोरडी राहील तसेच गटारी कोरड्या राहतील. मलमूत्राची ताबडतोब विल्हेवाट लावावी. सदैव गटारी वाहत्या राहतील याची काळजी घ्यावी. शेण साठवण्याची जागा गोठ्यापासून दूर असावे. सहसा बाहेरील व्यक्तींना गोठ्यात प्रवेश टाळावा . गोठ्याच्या प्रवेशावर फूट डिपची सोय करावी म्हणजेच छोटी आयताकृती सीमेंटचे हौद बनवून घ्यावे ज्याची खोली साधारण आपले पाय बुडतील एवढे असावे ज्यामध्ये पोटॅशियम परम्यांग्नटचे सौम्य द्रावण केलेले पाणी टाकावे



जेणेकरून बाहेरून येणारा व्यक्ति जंतूंनाशक द्रावणात पाय बुडवूनच गोठ्यात प्रवेश करेल. माश्यांच्या प्रादुर्भाव टाळण्यासाठी 'पेस्ट कंट्रोल' मशीनचा वापर करावा तसेच जमिनीवर फिनाईल सारखे औषध सौम्य स्वरुपात पाण्यात मिसळून फवारावे किवा शिंपडावे.

**३. दुधाची भांडी :**

दुधाची भांडी स्टेनलेस स्टीलची वापरावी. स्वच्छ करायला सोपे जाते. पात्रांचे तोंड छोटे असावे. दूध काढण्याच्या पूर्वी आणि नंतर भांडी गरम पाण्याने धुवावी. भांडी धुण्यासाठी डिटरजंट पावडर वापरल्यास चालेल. भांडी वाळवण्यासाटी उलटी करून ठेवावे. कास व सडेधुण्यासाठी तसेच दूध काढण्यासाठी वेगळे पात्र वापरावे.

**४. दूध काढतेवेळीची काळजी :**

दूध काढण्यापूर्वी जनावरास खरारा करावा. त्यामुळे अंगावरील सुटे केस निगुण जातील. दुधात पडत नाहीत. रक्तप्रवाह तसेच रक्ताभिसरण क्रिया वाढते, जनावरे हुशार व तरतरीत दिसू लागतात. गोचीड, माश्या, उवा, लिखा व इतर किटाणू पडून जातात त्यामुळे दूध काढतेवेळी गाय बैचेन दिसत नाही. दूध काढण्यापूर्वी जनावरे पाण्याने स्वच्छ धुवावे. मुख्यता कास, सडे, शेपटी व मागील भाग धुवावा. त्यामुळे घाण, शेण, माती, चिखल तसेच केस दुधात पडत नाहीत. दूध काढताना जनावरे शांत व समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करावा. मारजोड करू नये.

दूध काढण्यासाठी पूर्ण मूठ पद्धत वापरावी. अंगठा लावून दूध काढण्याची पद्धत चुकीची आहे यामुळे सडास इजा पोहचू शकते. दूध काढण्यासाठी मशीनचा वापर करत असाल तर त्यात काहीही दोष नसावा. एकंदरीत दुधात जीवाणूंची संख्या कमी करण्यासाठी चारही सडामधून सुरवातीच्या धारा जमिनीवर सोडावे. दूध काढण्याची जागा स्वच्छ असावी.

गाय पान्हावल्यानंतर कमीतकमी ७-८ मिनिटात गाय पिळावी. जास्त दूध देणारी गायीचे दिवसातून तीनदा दूध काढावे. दूध ठराविक वेळेत काढावे. दोन धारा काढण्याच्या वेळेतील अंतर ठराविक असावे. गाय पुर्णपणे पिळावी. कासेमध्ये दूध सोडू नये. विशेषकरून मशीनचे कप काढल्यानंतर हाताने पूर्णपणे दूध काढावे. कासेत दूध शिल्लक राहिल्यास कासदाह/स्तनदाह होण्याची दाट शक्यता असते. या आजारात दूध नासते. दूध पिण्यासाठी योग्य नसते. प्रथम निरोगी जनावरांचे दूध काढावे त्यानंतर आजारी जनावरांचे दूध काढावे.

शक्यतो वासरांना जन्मल्यापासून गायीला पाजवू नये, दूध पाजवण्यासाटी बॉटलचा वापर करावा जेणेकरून संडास जखमा होणार नाहीत, वासरू काही कारणास्तव मरण पावल्यास गाय दूध देणे चालूच ठेवते व वासराला त्याच्या वजनाप्रमाणे दूध पाजवता येईल.

**५. कासदाह/स्तनदाह प्रतीबंधात्मक उपाय :**

गाय आटत आल्यास हळूहळू भाकड करावी. पूर्णपणे दूध बंद झाल्यानंतर प्रत्येक सडातएक याप्रमाणे चारही सडात प्रतीजैवकाची ट्यूब सोडावी. गाय विण्याअगोदर ५०-६० दिवसापूर्वी भाकड करावी.

दररोज टीट डिप कप पद्धतीचा वापर कटाक्षाने करावा. दुधाळ जनावरामध्ये कासदाह आजार होऊ नये यासाठी स्वच्छतेसोबत टीट डिप कप पद्धत फारच उपयोगी आहे. या पद्धतीत एक प्लॅस्टिकचा कप व त्याला आयोडीनचे द्रावण असलेले प्लॅस्टिक बॉटल जोडलेले असते. प्रत्येक वेळेस दूध काढल्यानंतर चारही सडे टीट डिप कपमध्ये बुडवून घ्यावीत जेणेकरून सडाच्या उघड्या छिद्रामध्ये आयोडीनचे द्रावण भरले जाईल, परिणामी कसदाह आजारासाठी कारणीभूत जंतूचा सडामधील शिरकाव थांबेल. दररोज प्रत्येक वेळेस दूध काढल्यानंतर जनावरांना अर्धा ते एक तास उभेच ठेवावे यासाठी जनावरांना दूध काढल्यानंतर पेंढ किंवा वैरण द्यावे किंवा चरावयास सोडावे जेणेकरून जनावरे जमिनीवर बसणार नाहीत.

**६. गायींची सुप्तकासदाह तपासणी :**

साहजिकच कासदाह झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा कासदाह होवू नये म्हणून पंधरादिवसातून एकदा किंवा महिन्यातून एकदा कॅलिफोर्निया मस्टाटीस टेस्ट करून घ्यावी जेणेकरून गोठ्यात किती जनावरांना सुप्तकासदाह आजार आहे ते कळेल आणि उपचार करण्यास सुरुवात करता येईल. या तपासणीमुळे कासदाहाची बाह्य लक्षणे दाखवत नसतानाही कासदाह होण्याची दाट शक्यता असलेले सद ओळखता येते.

अश्या एक किंवा अनेक बाबींची शेतकऱ्यांनी काळजी घेतली तर जनावरांना बरेच आजार होण्यापासून रोखू शकता व स्वच्छ दूध निर्मिती करणे सहज शक्य होऊ शकेल.

♦ ♦ ♦

**मृगधारा शेतीमासिकासाठी छोट्या जाहिराती स्विकारल्या जातील.**

**मृगधारा शेतीमासिकाचे वर्गणीदार व्हा. वार्षिक वर्गणी रु. ६००/- १२ अंक घरपोच**